REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ४ मे. १९३८ अंक १८

धन्य त्या माता कीं ज्यांना काल " ध्रुवा " चें दर्शन झालें !
शेंकडो स्त्रियांना जागेच्या अभावीं परत जावें लागलें !

LADIES PLEASE EXCUSE

मुलामुलींच्या प्रभा पिक्चर्स ( कोल्हापूर ) कृत मराठी संगीत बोलपट

प्रभा चित्र

ध्रुव

शुक्रवार पेठ, मार्केटजवळ, पुणें ) ग्लोब टॉकीज, पुणें ( टेलिफोन नं. ६९१

शनिवार ता. ३० एप्रिलपासून सुरू

भूमिका—शरयू इनामदार ( सुरुचि )
शांता राणी ( सुनीति )
इंदु मिस्त्री ( नारद )
लीना फाटक ( उत्तम )
बालकराम ( ५ वर्षे ) ( ध्रुव )
खेरीज १००० मुलें व मुली

कथालेखक—स. अ. शुक्ल
संगीत नियोजक—अण्णासाहेब माईनकर
दिग्दर्शक—डी. कं. काळे
चित्रलेखक—कर्नाटकी
ध्वनिलेखक—भोळे

दररोज दोन खेळ ६॥ व १० वा. शनि. व रवि. जादा खेळ दुपारीं ३॥ वा.

प्रभा सुप्रीम प्रकाशन ! ध्रुवमधील गाणीं ' ओडियन ' वर ऐका.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण


संगीत-मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

गायन किं. ६ आ. हार्मोनियम किं. २॥ रु. दिलरुबा किं. १ रु. २ आ. फिडल किं. १ रु. ४ आ.

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.



टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

# विविध माहिती

### गोकाक मिल्स लि.

गोकाक येथील कपास कापडाच्या गिरणींत गेल्या वर्षी कामगारांचा संप चालू असल्यानें फक्त पांचच महिने ती गिरणी चालू होती. गिरणीस नफा १ लाख, ३१ हजार रुपये झाला. भागीदारांस ३ टक्के करमाफ डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. गेल्या सालीं ४½ टक्के दरानें डिव्हिडंड दिलें होतें.

### २० लक्ष लोकांस रक्तपिती

ब्रिटिश साम्राज्यांत एकूण २० लक्ष लोकांस रक्तपिती झालेली आहे, असा अजमास ब्रिटिश लेप्रसी रिलीफ असोसिएशनचे अध्यक्ष, सर विल्यम पील, ह्यांनी आपल्या भाषणांत नुकताच व्यक्त केला.

### रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

शंभर, एक हजार आणि दहा हजार रुपये किंमतीच्या स्वतः-च्या नांवाच्या चलनी नोटा रिझर्व्ह बँक लवकरच प्रचलित करणार आहे.

### परराष्ट्रीय हुंड्यांचीं टेंडर्स बंद

पाहिजे तसा भाव न मिळाल्यामुळें २० एप्रिल रोजीं रिझर्व्ह बँकेनें परराष्ट्रीय हुंड्यांविषयींचीं ७० हजार पौंडांचीं टेंडर्स स्वीकारलीं नाहींत. पुढच्या आठवड्यांत थोड्या रकमेचीं टेंडर्स मागवलीं असतांहि तीं मुळींच आलीं नाहींत, ह्या कारणास्तव परराष्ट्रीय हुंड्यांचीं टेंडर्स रिझर्व्ह बँकेनें तूर्त बंद ठेवलीं आहेत. आपली गरज ती अन्य मार्गानें भागविणार, हें उघड आहे.

### ब्रिटनमधील पोलीस

ग्रेट ब्रिटनमध्यें ४९,४२९ कॉन्स्टेबल आहेत. सरासरीनें ६५४ माणसांची वस्ती असलेल्या ६११ एकर एवढ्या क्षेत्रांत प्रत्येकास कामगिरी करावी लागते. ब्रिटिश पोलिसांचा एकूण वार्षिक खर्च ३० कोटि रुपये आहे.

### डनलॉप कंपनीचा नफा

मुख्य व दुय्यम जोड मंडळ्या मिळून डनलॉप रबर कंपनीस गेल्या वर्षी एकूण नफा सुमारें ३½ कोटि रुपये इतका झाला. तिला १ कोटि रुपयांचेवर सरकारास कर म्हणून रकम द्यावी लागली, तीमध्यें स्थानिक आणि कस्टम्ससारख्या करांचा अंतर्भाव नाहीं.

### इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज

ह्या प्रचंड कंपनीस गेल्या वर्षी १२½ कोटि रुपये नफा झाला.

### कृत्रिम रंगांचें जागतिक उत्पादन

सर्व जगांत मिळून दर वर्षी अडीच लक्ष टन वजनाचे कृत्रिम रंग तयार होतात. ह्यापैकीं २८ हजार टन ब्रिटिश कारखान्यांत बनवले जातात. १९१३ सालीं ब्रिटिश रंगांचें उत्पादन फक्त ४ हजार टन होतें तें १९२६ सालीं १३½ हजार टन झालें. गेल्या दहा वर्षांत हा आकडा दुप्पट झाला आहे. रंगाच्या उत्पादनांत जर्मनीचा नंबर जगांत पहिला आहे.

### जर्मन राष्ट्र धनकोचें ऋणको बनलें

महायुद्धापूर्वी जर्मन राष्ट्राची २,५०० कोटि रुपयांची परदेशांत सावकारी होती. १९३० मध्यें जर्मनीस २,६०० कोटि रुपये परदेशांतलें देणें झालें. हा कर्जाचा बोजा आतां १,००० कोटि रुपयांपर्यंत खालीं आला आहे.

### इटलींत रासायनिक धंदे

इटलींतल्या रासायनिक धंद्यांत सुमारें ४ लक्ष माणसें कामा-वर आहेत. गेल्या पंधरा वर्षांत त्यांच्या उत्पादनांत अडीच पटीनें वाढ झाली आहे.

### गव्हाचा जागतिक व्यापार

स्वतःची गरज भागवण्यासाठीं कित्येक देशांस बाहेरून गहूं आणावा लागतो आणि आपली गरज भागवून परराष्ट्रांस गहूं पुर-विणारे इतर देश आहेत. ह्यांपैकीं पहिल्या वर्गांतील देशांची गरज चालू मोसमांत ५२ कोटि बुशेल इतकी आहे आणि दुसऱ्या प्रकारच्या देशांत ६५ कोटि बुशेल गहूं विकण्यास शिल्लक आहे.

### स्वीडन देशाचा परराष्ट्रीय व्यापार

स्वीडन देशाच्या परराष्ट्रीय आयात-निर्गत व्यापाराची किंमत १९३७ सालांत सुमारें ३०० कोटि रुपये इतकी झाली. तत्पूर्वीच्या वर्षाच्या मानानें हा आकडा १० टक्क्यांची वाढ दर्शवितो.

### विजेचा धंदा

ग्रेट ब्रिटनमध्यें वीज घेणारीं एकूण ८५½ लक्ष गिऱ्हाइकें आहेत. त्यांतलीं ८५ टक्के घरांत वीज वापरणारीं आहेत. ९६ हजार लोकांस विजेच्या धंद्यांत काम मिळतें आणि त्यांची एकूण मिळकत २० कोटि रुपये आहे.

### शाळांतील मुलांस दुधाचा खुराक

शाळांतील मुलांस दररोज दुधाचा खुराक मिळण्याची योजना इंग्लंडमध्यें सरकारनें केली आहे. पन्नास लक्ष मुलें ह्या खुराकास पात्र आहेत. त्यांपैकीं निम्म्यांस दूध मिळण्याची सोय झाली आहे.

### नवीन विमा कायदा

विमाविषयक नवीन कायदा १ ऑक्टोबर, १९३८ रोजीं अंमलांत येणार आहे. १ एप्रिल, १९३९ चे आंत सर्व विमा कंप-न्यांनीं त्या कायद्यास धरून आपल्या कारभारांत सुधारणा केली पाहिजे.

### टोमॅटोच्या सालीपासून रबर

टोमॅटोच्या सालीपासून रबर करतां येतें, हें एका इटालियन शास्त्रज्ञानें सिद्ध केलें आहे.

### क्षयरोग निवारण फंड

क्षयरोग निवारण फंडाचा आकडा १५ एप्रिल रोजीं ३० लक्ष रुपये इतका झाला.

### प्रांतिक रस्त्यांच्या ग्रँटची वांटणी

मुंबई प्रांताच्या चालू वर्षाचे अंदाजपत्रकांत खेडेगांवी रस्त्यां-करितां ४½ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या रकमेची वांटणी खालीं दिल्याप्रमाणें निश्चित झाली आहे:— उत्तर भाग १,२४,००० रुपये, मध्य भाग २,००,००० रुपये व दक्षिण भाग १,२५,३०० रुपये.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ८ आ. १० पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ८ आ. १० पै इतका पडला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| १७-४-३८ ते २३-४-३८ | २,८२,६१७ |
| २४-४-३८ ते ३०-४-३८ | २५,८०,७०७ |
| २१-९-३१ ते ३०-४-३७ | ३,१३,५६,२७,९५१ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २०८ | ५ प्रामाणिक धंदा कीं जुगार ! ... | २१३ |
| २ मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याचा अहवाल | २०९ | ६ सांगली बँक लि., सांगली | २१३ |
| ३ विजयानगरम् येथें सहकारी प्रश्नांची चर्चा | २१० | ७ घर गहाणावर कर्जें देणारी संस्था ... | २१४ |
| ४ स्फुट-विचार ... | २११ | ८ सहकारी चळवळ ... | २१६ |
| स्वदेशी साखरेचे महाराष्ट्रीय कारखाने—वाढती लोकसंख्या आणि पोटापाण्याचा प्रश्न—ब्रिटिश सरकारचें अंदाजपत्रक—हिंदी चलनपद्धतीचा इतिहास. | | ९ निवडक बाजारभाव | २१७ |
| | | १० विश्वेश्वर अय्या कमिटीचा रिपोर्ट ... | २१७ |
| | | ११ विषारी वायूपासून रक्षणारीं मुखत्राणें ... | २१७ |



# अर्थ

बुधवार, ता. ४ मे, १९३८


## मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याचा अहवाल

### १९३६–३७ मधील प्रगति

युरोपांत युद्धाचे ढग दिसूं लागल्यापासून जगांतील सर्वच देशांत स्थानिक औद्योगिक उत्पादनास चालना मिळालेली आहे. युद्ध चालू असतांना आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांत अडथळा येऊन प्रत्येक देशास अंतर्गत उत्पादनावरच अवलंबून रहावें लागतें, युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनास प्राधान्य दिलें जातें व नेहमींच्या गरजा भागविणाऱ्या जिनसांची मागणी पुरी पडणें कठीण होतें. अशा परिस्थितींत विशिष्ट जिनसांचे बाजारभाव कडकतात व त्यांची कमान चढीची असेपर्यंत उत्पादकांची चलती टिकते. युद्धाचा संभव दिसूं लागतांच त्याचा फायदा मिळविण्यासाठी तयार मालाचा साठा वाढविण्याचा कारखानदारांचा यत्न असतो. १९३६–३७ ह्या वर्षीं, विशेषतः त्या सालाच्या उत्तरार्धांत, युद्ध उद्भवण्याचा रंग दिसत होता व साहजिकच कारखानदारांस नफ्याची अपेक्षा वाटत होती. हिंदुस्थानांत होणाऱ्या परदेशी मालाच्या आयातीमधील घट व त्यामुळें देशी मालाच्या उठावास मिळणारा वाव, स्वस्त दरानें भांडवलाचा पुरवठा, इत्यादि कारणांमुळें मुंबई प्रांतांतील कारखानदारांस उत्पादन वाढविण्यास उत्तेजन मिळालें आणि त्याचा परिणाम प्रांताच्या औद्योगिक प्रगतीचे दृष्टीनें इष्ट असाच झाला.

संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचे संख्येंत व त्यांच्या भांडवलांत वाढ हें उपरिनिर्दिष्ट प्रगतीचें एक प्रमुख गमक म्हणतां येईल. १९३६-३७ सालीं मुंबई प्रांतांत १६४ नवीन मंडळ्या नोंदल्या गेल्या व अस्तित्वांत असलेल्या एकूण मंडळ्यांच्या भांडवलांत ७७ लक्ष रुपयांची भर पडली. १९३५-३६ अखेर, त्या सालाच्या आरंभीचे मानानें, हें भांडवल ३२ लक्ष रुपयांनीं घटलें होतें, हें लक्षांत घेतलें म्हणजे वरील वाढाव्याचें महत्त्व तात्काळ पटेल. १९३६-१९३७ सालीं स्थापन झालेल्या मंडळ्यांत दोन कपास कापडाच्या गिरण्या आहेत व एक रेशमाची गिरणी आहे. ७० लक्ष भांडवलाच्या १३ फिल्म कंपन्यांची ह्याच मुदतींत स्थापना झाली. विजेच्या नवीन कंपन्यांची संख्याहि १३ च होती व त्यांनीं १, कोटि ४२ लक्ष रुपये भांडवल आकर्षलें. सिमेंट व फरशा ह्यांचे ८ कोटि भांडवलाचे २ कारखाने निघाले. २३ छापखान्यांत मिळून ४६ लक्ष रुपये भांडवल गुंतलें. अशा रीतीनें, एकूण ११¾ कोटि रु. अधिकृत भांडवलाचा हिशेब लागतो. १ कोटि, १६ लक्ष रुपये भरणा झालेलें भांडवल असणाऱ्या कंपन्या १९३६–३७ मध्यें विसर्जन पावल्या.

हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांमध्यें मुंबई प्रांत हा कपास कापडाच्या गिरण्यांचे दृष्टीनें महत्त्वाचा आहे. इतर प्रांतांतूनहि आतां गिरण्या स्थापन झालेल्या असल्यानें मुंबईचें हें वैशिष्ट्य थोडें कमी होत चाललें असलें, तरी ह्या गिरण्यांचें असलें केंद्रीकरण हिंदुस्थानांत इतरत्र आढळत नाहीं. मुंबई प्रांताच्या ब्रिटिश जिल्ह्यांत १९१ गिरण्या आहेत. अहवालाचे वर्षीं पूर्वीं बंद असलेल्या २ गिरण्यांनीं पुनः कामास प्रारंभ केला. चात्यांच्या संख्येंत घट झाली, तथापि मागांची संख्या सुमारें ७०० नीं वाढली. गिरण्या भारी नंबराच्या सुताचा जास्त प्रमाणांत उपयोग करूं लागल्यामुळें हिंदी कपाशीचा उठाव थोडा कमी झाला. रात्रपाळी करणाऱ्या गिरण्यांची संख्या वाढली. कित्येकांत नवीं यंत्रें बसविण्यांत आलीं, अहमदाबाद येथील गिरण्यांचें कापडाचें उत्पादन वाढलें, हिन्दी कापड परदेशाच्या बाजारांत खपूं लागलें आणि परदेशी कापडाची आयात खुंटली.

साखरेच्या कारखान्यांच्या दृष्टीनेंहि १९३६–३७ साल चांगलें गेलें. संस्थानी हद्दींत २ व ब्रिटिश हद्दींत ६ अशा ८ साखर कारखान्यांपैकीं ब्रिटिश हद्दीमधील ६ कारखान्यांत मिळून ३४,१४९ टन साखर तयार झाली. १९३५–३६ सालीं २४,७४६ टनांचें उत्पादन झालें होतें. एका वर्षाचे अवधींत मुंबई प्रांतांत होणारी साखरेची आयात १ कोटि, २१ लक्ष रुपयांवरून ६ लक्ष रुपयांवर आली. लोकर, रसायनें, कागद, कांचसामान, साबण, इत्यादींच्या कारखान्यांनींहि प्रगति केल्याचा अहवालांत उल्लेख आहे.

खेडेगांवी उद्योगधंदे, कातडी कमावण्याचा धंदा, धंदेशिक्षणाच्या सोयी, मासे पकडण्याचा धंदा, इत्यादि विषयांचा परामर्श औद्योगिक खात्याचे अहवालांत घेतला आहे. तथापि, मुंबई व अहमदाबाद येथील कारखान्यांत सुशिक्षित तरुणांस उमेदवार म्हणून कामाचा अनुभव देऊन व त्यांस आवश्यक तें तात्त्विक ज्ञान पढवून व्यवसायास लायक करण्याची मुंबई सरकारनें योजना आंखली, तिचा उपयोग किती होत आहे, ह्याची तपशीलवार माहिती त्यांत दिली असती तर ती उपयुक्त झाली असती. सुशिक्षितांच्या बेकारीचे निवारणासाठीं सरकारनें केलेल्या प्रस्तुत उपक्रमाचे यशस्वितेवर तरुण पिढीचें आर्थिक भवितव्य बरेचसें अवलंबून आहे. लहान कारखान्यांची वाढ व खेडेगांवी उद्योगधंद्यांची जोपासना ह्या गोष्टी मोठ्या कारखान्यांच्या प्रगतीबरोबर घडून आल्या पाहिजेत; त्यावांचून आमच्या प्रांतांतील लोकांस बाहेरील स्पर्धेस तोंड देतां येणें अशक्य होईल. उत्पादन पद्धतीमध्यें आवश्यक ती सुधारणा सर्वच लहानमोठ्या धंद्यांत होणें आवश्यक आहे. लहान व मोठे उद्योगधंदे ह्यांच्या प्रगतीची सांगड घालण्याचें आवश्यक कार्य प्रांतिक औद्योगिक खात्यानें करावयाचें आहे आणि त्याकरितां सर्व सहकारी खात्यांचें सहकार्य होणें अगत्याचें आहे. आर्थिक उद्धाराचा प्रश्न बिकट आहे, ह्यांत शंका नाहीं आणि तो सोडविण्याचे मार्गहि गुंतागुंतीचे व अनेकविध आहेत. सर्व बाजूंनीं सारखा प्रयत्न झाला तरच औद्योगिक उन्नतीच्या

प्रयत्नांस यश मिळणें सुलभ होईल. मुंबई सरकारास ह्या गोष्टीची जाणीव आहे व त्यांचे त्याबाबत प्रयत्न चालू आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. म्हणूनच आर्थिक प्रगतीच्या कार्यक्रमाच्या व्यापकपणाकडे त्याचें लक्ष वेधणें आवश्यक आहे.

---

## विजयानगरम् येथें सहकारी प्रश्नांची चर्चा

---

### मान्य झालेले ठराव

(२)

(११) जुन्या कर्जाच्या फेडीसाठी जमीन गहाणाच्या बँकांनीं यावयाच्या कर्जाबाबत रिझर्व्ह बँकेनें आपल्या रिपोर्टाच्या २७ व्या पॅऱ्यांत केलेलीं विधानें आणि शिफारशी अमान्य आहेत.

(१२) त्या रिपोर्टाच्या ३४ व ३७ ह्या पॅऱ्यांमध्यें प्रांतिक सहकारी बँकांविषयींचें जें धोरण रिझर्व्ह बँकेनें व्यक्त केलें आहे तें त्या बँकेच्या कायद्याचे उद्देशाशीं विसंगत आहे. प्रांतिक सहकारी बँकांस शेड्यूल्ड बँकांप्रमाणेंच सर्वस्वीं वागवण्यांत यावें अशी हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांस विनंति आहे. सहकारी बँकांनीं रिझर्व्ह बँकेंत विशिष्ट किमान रकमांची शिल्लक ठेवली पाहिजे ही मागणी कायद्यानें त्यांस दिलेल्या सवलतींच्या विरुद्ध आहे.

(१३) सहकारी संस्थांनीं कायद्याच्या दुरुस्तीबाबत आणि इतर सूचना रिझर्व्ह बँकेस केल्या आहेत, त्यांचा विचार पुढें ढकलला तरी चालेल हें त्या बँकेचें मत अमान्य आहे. ह्या सूचना व दुरुस्त्या तात्काळ विचारांत घेतल्या जाणें अगत्याचें आहे.

(१४) वरील संबंधांत पूर्वीं शिफारशी केलेल्या आहेत, त्यांचा पुनरुच्चार करून त्यांवर जोर देणें आवश्यक आहे:—

(अ) शेतीच्या धंद्यास सहाय करण्यासाठी रिझर्व्ह बँकेंत स्वतंत्र खातें कायद्यानें निर्माण केलेलें असतां, त्याचा उद्देश बँकेनें डोळ्यांसमोर ठेवल्याचें दिसत नाहीं. योग्य सुरक्षितपणा व जामिनकी ह्यांच्या अटीवर रिझर्व्ह बँकेनें प्रांतिक सहकारी बँकांस अल्प मुदतीनें कर्जें दिलीं पाहिजेत.

(आ) मुद्दल व व्याज ह्यांचे संबंधांत सरकारनें हमी घेतली असेल तेथें जमीन गहाणाच्या सहकारी बँकांच्या डिबेंचर्समध्यें रिझर्व्ह बँकेनें पैसे गुंतवावे आणि त्यांच्या तारणावर पैसे कर्जाऊ द्यावे.

(इ) जमीन गहाणाच्या मध्यवर्ती बँका सहकारी तत्त्वावरच स्थापन झालेल्या असल्या पाहिजेत. त्यांची घटना जॉइंट स्टॉक पद्धतीची असूं नये. सहकारी जमीन गहाणाच्या बँका जनतेच्या विश्वासास पूर्णपणानें पात्र झालेल्या आहेत.

(ई) सहकारी बँकांच्या व्यवस्थापक मंडळांत ठेवीदार किंवा व्यापारी बँका ह्यांचे प्रतिनिधी घेण्याची आवश्यकता नाहीं.

(उ) लांब मुदतीचीं कर्जें जमीन गहाणाच्या बँकांनीं द्यावीं आणि पिकांच्या मुदतीचीं कर्जें प्राथमिक पेढ्या व मध्यवर्ती बँका ह्यांनीं द्यावीं हें तत्व मान्य आहे. तथापि, मध्यम मुदतीचीं कर्जें देण्याची मुभा ह्या संस्थांस असली पाहिजे. ह्या कर्जांचे योग्य प्रमाणांत लांब मुदतीच्या ठेवी मात्र त्यांचेजवळ असणें आवश्यक आहे.

(ऊ) लांब हप्तेबंदी करून देऊनहि कर्जफेड होण्याचा संभव दिसत नाहीं अशा परिस्थितींत कर्जाच्या रकमा कायमच्या कमी करणें आवश्यक आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि, ह्या बाबतींत सर्वांस सारख्याच लागूं होतील अशा योजना अंमलांत आणण्याचा आग्रह केला जाऊं नये. परिस्थिति सुधारली असतां कांहीं वसूली होण्याचा संभव असल्यानें बँका आणि पेढ्या ह्यांस विशिष्ट रीतीनें थकबाकीचा प्रश्न सोडविण्याची संधि देण्यांत यावी.

(ए) जमीन गहाणाच्या बँकांच्या डिबेंचर्सच्या रकमा वाटेल तेव्हां परत करण्याचा अधिकार त्या बँकांस असण्याची पद्धति चुकीची आहे. डिबेंचर्सची फेड होण्यास विशिष्ट वर्षांची मुदत हवी. परत फेडीच्या सोयीसाठी स्वतंत्र फंड निर्माण केला जावा आणि त्याचा उपयोग बाजारांत डिबेंचर्स खरेदी करण्याकडे व्हावा.

(१५) सोसायट्यांचीं लांब मुदतीचीं कर्जें जमीन गहाणाच्या बँकांकडे वर्ग करण्यांत यावीं. ह्याचा उपयोग सोसायट्यांच्या थकबाक्या वसूल होण्यास होऊन सहकारी पद्धतीच्या व्यवहारांची माहिती असलेले कर्जदार जमीन गहाणाच्या बँकांस मिळतील.

(१६) जमीन महसूल किंवा खंड ह्यांच्या वसुलीसाठी सरकारमार्फत जमीनी लिलावानें विकल्या जातात, तेव्हां अधिकाऱ्यांनीं सहकारी संस्थांस त्याबद्दल योग्य वेळीं माहिती द्यावी.

(१७) शेतीची सुधारणा, खेडेगावीं धंद्यांची स्थापना इत्यादि मार्गांनीं सरकारांनीं आपापल्या प्रांतांत शेतकऱ्यांची मिळकत वाढविण्याची खटपट करावी अशी त्यांस विनंति आहे.

(समाप्त)

---

### चलनी नोटांचे विभाग—पोस्ट खातें हमी घेत नाहीं

इतके दिवस चलनी नोटा अगर त्यांचे कापलेले अर्धे भाग पाकिटांतून पोस्टानें पाठविणें झाल्यास त्यांचा सक्तीनें विमा उतरावा लागे. विमा उतरविलेल्या चलनी नोटांचे अर्धे तुकडे गहाळ झाल्यास, बाकीचे दुसरे अर्धे तुकडे दाखल केल्यानंतर पूर्ण रकमेची भरपाई पोस्ट ऑफिस करीत असे. आतां ह्या बाबतच्या नियमांत दुरुस्ती करण्यांत आली आहे. सबंद नोटा पाठविणें असल्यास त्यांचा विमा उतरविला पाहिजे परंतु नोटांचे अर्धे विभाग इन्शुअर न करून पाठविले तरी चालेल. ते इन्शुअर केले असले तरी पोस्ट खातें त्यांच्या नुकसानीची भरपाई करण्यास ह्यापुढें जबाबदार नाहीं.

---

### इमारतीच्या आराखड्याबाबत चढाओढ

असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लि. ला मुंबई येथें एक नवीन इमारत बांधावयाची आहे. सिमेंट कॉंक्रीटच्या कामाचा एक उत्कृष्ट नमुना ह्या दृष्टीनें सदरहु इमारतीची रचना व्हावी, ह्याकरितां कंपनीनें बांधकामाच्या आराखड्यांची एक चढाओढ लावली. एकूण ३५ आराखडे कंपनीकडे दाखल झाले, त्यांचा अनुक्रम त्रयस्थाकडून लावण्यांत आला (१) मेसर्स बॅलार्डी, टॉमसन ॲन्ड मॅथ्यूस, कलकत्ता; (२) श्री. एस. एच. पार्लेकर, मुंबई व (३) मेसर्स मराठे ॲन्ड कंपनी, मुंबई अशा अनुक्रमानें २,५०० रु. १,५०० रु., व १,००० रुपयांचीं बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं.

---

# स्फुट विचार

### स्वदेशी साखरेचे महाराष्ट्रीय कारखाने

स्वदेशी साखरेच्या कारखान्यांस महाराष्ट्रांतली नैसर्गिक परिस्थिति अत्यंत अनुकूल आहे. साखरेच्या कारखान्यांची गर्दी संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्रांतांत झालेली आहे, तसा प्रकार महाराष्ट्रांत नाहीं. मुंबई इलाख्यांत ब्रिटिश मुलूख व संस्थानें ह्यांत मिळून एकूण आठ कारखाने चालू आहेत. त्यांमध्यें तयार होणाऱ्या साखरेचा खप होण्यास पुरेसा वाव आहे कीं नाहीं, त्यांस उत्तर हिंदुस्थानांतल्या कारखान्यांची स्पर्धा भोवेल कीं काय इत्यादि शंका कित्येक लोकांच्या मनांत येतात. परंतु परिस्थितीचा विचार केला असतां त्या सर्वस्वी निराधार आहेत ह्या विषयींची खात्री तेव्हांच पटण्यासारखी आहे. मुंबई इलाख्यांतले साखरेचे सर्व कारखाने महाराष्ट्रांतच आहेत, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. कालव्याच्या पाण्याचा पुरवठा, जमिनीचा गुण, हवा, उंसाच्या लागवडीचा व गूळ करण्याच्या धंद्याचा अनुभव इत्यादि बाबतींत महाराष्ट्रांतली परिस्थिति विशेष अनुकूल आहे. ऊंस आणि साखर ह्यांचे संबंधांतल्या धंद्यांविषयीं सहानुभूति दाखवून त्यांच्या मार्गांतल्या अडचणी दूर करणें हें प्रांतिक सरकारचें कर्तव्य आहे. ह्या धंद्यांच्या उत्कर्षापासून प्रांताच्या आर्थिक उन्नतीस सहाय मिळून सरकारच्या प्रत्यक्ष उत्पन्नांतहि भर पडणार आहे हें विसरतां कामां नये. १९३६–३७ सालाबाबतचा मुंबई प्रांताच्या सरकारी औद्योगिक खात्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यांत साखरेच्या कारखान्यांच्या प्रगतीचा उल्लेख करण्यांत आला आहे. त्यांत खालील उद्गार काढले आहेत, त्यांचेकडे जनतेचें लक्ष वेधणें आवश्यक आहे:–"मुंबई इलाख्यांत होणाऱ्या साखरेच्या खपाचा अंदाज पाहतां साखरेच्या कारखान्यांचे प्रगतीस पुष्कळ वाव आहे ह्यांत संशय नाहीं. चांगल्या जातीचा ऊंस इत्यादि बाबी त्या प्रगतीस अनुकूल आहेत." महाराष्ट्रांत साखरेचें उत्पादन वाढल्यास तिचा खप कसा होईल ह्याविषयीं घेण्यांत येणाऱ्या शंकेस सरकारी औद्योगिक खात्यानें अधिकारयुक्त रीतीनें वरील विधानांत समाधानकारक उत्तर दिलें आहे. सुधारलेल्या जातींच्या उंसाच्या लागवडीचें महत्त्वहि त्यांत प्रतिपादलें आहे. महाराष्ट्रीय कारखान्यांत जो ऊंस उपयोगांत येत आहे तो सुधारलेल्या जातींचा व सकस असल्यानें उंसाच्या पैदाशीचें दर एकरी प्रमाण मोठें असून साखरेचा त्यापासून होणारा उताराहि समाधानकारक असतो, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. भांडवल व संघटन ह्यांच्या सहायानें महाराष्ट्रांतील अनुकूल परिस्थितीचा अधिकांत अधिक उपयोग लोकांनीं करून घेणें अगत्याचें आहे.

### वाढती लोकसंख्या आणि पोटापाण्याचा प्रश्न

हिंदुस्थानची लोकसंख्या १९२१ सालीं सुमारें ३२ कोटि होती ती १९३५ मध्यें ३७ कोटि होऊन १९४१ मध्यें ४० कोटि इतकी वाढेल असा अंदाज आहे. म्हणजे, ह्या वीस वर्षांच्या मुदतींत हिंदी लोकसंख्येंत ८ कोटि माणसांची भर पडली असें होईल. ह्या वाढत्या लोकसंख्येच्या पोटापाण्याची व्यवस्था काय करावयाची हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. फाजील वाढत्या लोकसंख्येवर संतति–नियमनाचा उपाय सुचवण्यांत येत असून त्या संबंधानें प्रचारहि चालू आहे. ह्या उपायाच्या इष्टानिष्टतेविषयीं तीव्र मतभेद प्रचलित आहेत. तथापि, त्याची इष्टता मान्य केली तरी तो अंमलांत येऊन त्याचा दृश्य परिणाम प्रतीत होण्यास दीर्घकाळ लोटावा लागेल ह्यांत शंका नाहीं. असें असल्यानें जनतेची आर्थिक उत्पादन शक्ति वाढवून संपत्तीच्या वांटणींतली विषमता शक्य तितकी दूर करणें हा मार्ग व्यावहारिक दिसतो. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं त्या संस्थेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं प्रस्तुत विषयाचा उल्लेख करून लोकसंख्येची वाढ आणि लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्राचा विस्तार ह्यांचें परस्पर प्रमाण प्रतिकूल असून जमिनीवरचा लोकसंख्येचा दाब गेल्या पंधरा वर्षांत ११ टक्के वाढला आहे असें सांगितलें. हिंदुस्थानांत शेतीचें क्षेत्रफळ लोकसंख्येच्या प्रमाणांत वाढणें शक्य नाहीं. त्याचा थोडाबहुत विस्तार होऊं शकेल; परंतु शेती सुधारून ती अधिक कार्यक्षम व उत्पादक करणें हाच श्रेयस्कर मार्ग आहे. एवढेंच नव्हे, तर उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांचा उत्कर्ष होऊन सध्यापेक्षां अधिक लोकांस त्यांत काम मिळेल अशी तजवीज होणें आवश्यक आहे. नुसत्या शेतीवर हिंदी जनता जगणें अशक्य आहे आणि तिचें क्षेत्रफळ वाढून त्या योगानें लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवूं पहाणें व्यर्थ आहे. लोकसंख्या आणि पिकांखालचें जमिनीचें क्षेत्र ह्यांची विषमता सर जेम्स टेलर ह्यांनीं निदर्शनास आणली आहे, ती मान्य करण्यासहि हिंदुस्थान सरकार पंचवीस वर्षांमागें तयार नव्हतें ह्या गोष्टीची आठवण येथें देणें आवश्यक आहे. लोकसंख्येच्या मानानें अन्नाचा पुरवठा वाढत नाहीं हें प्रचलित महागाईविषयींच्या आपल्या चौकशी रिपोर्टांत श्री. दत्त ह्या सरकारी अधिकाऱ्यानें केलेलें विधान निराधार आहे असा आक्षेप त्या वेळीं घेण्यांत आला होता. लागवडीचें क्षेत्र वाढलें नाहीं तरी त्याची उत्पादकता वाढली आहे असें सरकारचें म्हणणें होतें. राष्ट्रीय आर्थिक धोरणांत योग्य बदल करण्याची भाषा त्या वेळीं नव्हती आणि आजहि नाहीं एवढें साम्य मात्र वरील दोन प्रसंगांत आहे.

### ब्रिटिश सरकारचें अंदाजपत्रक

ब्रिटिश-सरकारचे फडनवीस, सर जॉन सायमन, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत पार्लमेंटास आपलें बजेट सादर केलें. १९३७-३८ साळच्या हिशेबांत सुमारें ३७½ कोटि रुपयांचा वाढावा आढळून येत असल्याचें त्यांनीं प्रारंभीं सांगून, त्याचीं कारणें निवेदन केलीं. अपेक्षेपेक्षां उत्पन्न जास्त झालें, बेकारी निवारणाच्या तरतुदींमध्यें बरीच बचत झाली व खर्चाच्या जादा मागण्या उद्भवल्या नाहींत, ह्यामुळें ही समाधानकारक परिस्थिति निर्माण झाली. १९३८-३९ सालीं खर्चाचा अंदाजी आंकडा १२ अब्ज, २९ कोटि रुपये, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षां १ अब्ज, ५ कोटींनीं मोठा आहे. खर्च सुमारें १३ अब्ज, ३० कोटि रुपये होईल व त्यामुळें पडणारी तूट करवाढीनें भरून काढावी लागेल. प्राप्तीवरील कर दर पौंडामागें ६ पेन्स वाढवून तो ५ शिलिंग, ६ पेन्स करावा, अशी फडनवीसांची शिफारस आहे. चहावरील पट्टींतहि २ पेन्सांची वाढ सुचविण्यांत येऊन पेट्रोलवरील पट्टी दर गॅलनी ८ पेन्स होती ती ९ पेन्स करण्यांत आली आहे. अशा रीतीनें जादा करापासून मिळणारें उत्पन्न लक्षांत घेतां, अंदाजपत्रक वाढाव्याचें झालेलें आढळून येतें. अंदाजपत्रकांतील जमाखर्चाच्या सदरांची तोंडमिळवणी करतांना ब्रिटिश सरकारनें करवाढीपेक्षां काटकसरीकडे व आपल्या खात्यांच्या पुनर्घटनेकडे अधिक लक्ष द्यावें, असें सुचविण्याची आतां वेळ आली आहे. भरभराटींत असलेल्या राष्ट्राच्या उत्पन्नास कांहीं मर्यादा आहे व त्यासहि केव्हांतरी उत्पन्न वाढविण्याऐवजी खर्च कमी करण्याची पाळी आल्याविना रहाणार नाहीं.

## "हिंदी चलनपद्धतीचा इतिहास" *

श्री. य. वा. लोहोकरे, सोलापूर, ह्यांचें वरील विषयासंबंधानें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मार्गांत हुंडणावळीची अडचण कशी येते, तिच्या साधनानें राष्ट्रीय उत्पादन व व्यापार ह्यांचें नियंत्रण कसें करतां येतें, चलनाच्या विनिमय किंमतींत फेरफार करून लोकांची क्रय-विक्रय शक्ति तात्पुरती कां होईना, कशी नियंत्रित करतां येते, इत्यादि प्रश्नांचें आकलन सामान्य जनतेस होत नाहीं. चलनाच्या विशिष्ट पद्धतीच्या नियंत्रणामुळें देशाचा नफा अगर नुकसान हीं कशीं होतात, हें कोडें त्यांस सुटणें शक्य नाहीं. सुशिक्षित व रोजच्या आर्थिक घडामोडींशीं परिचय असणाऱ्या लोकांचीहि ह्या प्रकारची अवस्था असते असा अनुभव आहे. हिंदी चलनपद्धतीचा इतिहास पाहिला असतां, हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश हितसंबंधांची जितकी काळजी आजवर वाहिली तितकी हिंदी जनतेच्या हिताची वाहिली नाहीं, असें अनुमान सहज निघतें. कित्येक प्रसंगीं, हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार ह्यांचेमध्यें मतभेद झाला असतां, हिंदुस्थान सरकारास पड खावी लागलेली आहे. हुंडणावळीच्या कारवाईचें रहस्यच समजलें नाहीं, तर तिच्या विरुद्ध प्रभावी लोकमत तरी कसें तयार होणार? ह्या दृष्टीनें श्री. लोहोकरे ह्यांच्या पुस्तकाचें आम्ही मनःपूर्वक स्वागत करतों. हिंदी चलनपद्धतीविषयीं तपशीलवार माहिती देतांना श्री. लोहोकरे ह्यांनीं तिच्या पार्श्वभूमीचें सुगम वर्णन केलें आहे व चलनपद्धतीची व हुंडणावळीची मोडणी स्पष्टपणें समजावून दिली आहे. चलनपद्धति, हुंडणावळ, सोन्याची निर्गत, मध्यवर्ती बँकेचीं कर्तव्यें, विनिमय साधनाचें प्रसरण व आकुंचन, इत्यादींचा परस्पर संबंध त्यांनीं दाखवून दिला आहे. चलन व हुंडणावळ ह्यावरील ताबा परक्यांचे हातीं असल्यामुळें हिंदुस्थानास कसें नुकसान सोसावें लागलें आहे त्याची कल्पना श्री. लोहोकरे ह्यांचे पुस्तकावरून वाचकांचे ध्यानांत येईल आणि आर्थिक बाबतींत राजकीय सत्ता कशी प्रभावी होते हेंहि समजेल. १६ विरुद्ध १८ पेन्सांच्या हुंडणावळीच्या लढ्याचें मर्म समजण्यास पुस्तकांतील विवेचनाचें सहाय होईल. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेमुळें हिंदी चलन व हुंडणावळ ह्यांचे व्यवस्थेंत झालेला फरक लेखकानें विस्तारानें दिला असता म्हणजे पुस्तकांतील कथन आजच्या परिस्थितीपर्यंत येऊन पोचलें असतें. तथापि लेखकास वाचकाच्या मनांत पटवून देण्याच्या सिद्धांतांत त्यानें काडीइतकाहि बदल होत नाहीं. चालू घडामोडींचें आकलन करून घेऊं इच्छिणाऱ्या वाचकांत श्री. लोहोकरे ह्यांचें पुस्तक चलनविषयक प्रश्नाबाबत जागृति निर्माण करील ह्यांत शंका नाहीं.

---

### मुंबई प्रांतांतील कपाशीचें उत्पादन

मुंबई प्रांतांत एकूण ६० लक्ष २३ हजार एकर जमिनींत लावलेल्या कपाशीपासून १२ लक्ष ८ हजार गांठी कपास निघेल. असा प्रांतिक सरकारच्या शेतकी खात्याचा १९३७-३८ सालाविषयींचा अजमास आहे. महाराष्ट्रांतील कपाशीच्या लागवडीचे क्षेत्रांत वाढ झाली आहे.

---

*पृ. संख्या ९१. किंमत १२ आणे. लेखक : श्री. य. वा. लोहोकरे, सोलापूर.





अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

**आपण विचार केला आहे का ?—**

श्री. ग. स. मराठे, ऑक्टुबरी ता. १।२।३८ च्या 'केसरी'त लिहितात. " ......सर्वसाधारण बॉंड योजनांच्या विरुद्ध मीं तो लेख लिहिला असें नाहीं. बॉंड योजना हा विम्याच्या अनेक प्रकारांपैकीं एक प्रकार आहे व प्रत्येक योजनेचा विचार जिच्या तिच्या गुणावरून केला पाहिजे..." सही ग. स. मराठे

**कल्पतरु बॉण्ड्**

इतका लोकप्रिय होण्याचें कारण—ती योजना बहुजनांस पटली आहे. अजूनहि फक्त १३॥ रु. भरून 'कल्पतरु बॉंड' घेतल्यास येत्या बक्षीस वांटणींत बक्षीस मिळण्याची संधि साधतां येईल. अधिक माहितीकरितां स्थानिक प्रतिनिधीस भेटा, किंवा खालील पत्त्यावर लिहा :

टी. आर. अभंग स्पे. ऑ.) महाराष्ट्र अिन्शुअरन्स कं.
सातारा सिटी ) लि., कऱ्हाड (जि. सातारा)

**दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड**
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम्. स्टेशन ) बंगलूर
शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.
अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

अेम्. जमशेदजी, अेजण्ट, मुंबई
अेस्. अेस्. भावे, अेलअेल. बी., सेक्रेटरी, पुणें.

## प्रामाणिक धंदा कीं जुगार ?

**पत्रांच्या साखळीचा दुवा न तुटल्यास प्रत्येकास २,००० रु. मिळण्याचा संभव**

म्यूच्युअल बेनिफिट पब्लिशिंग कंपनी ह्या नांवाखालीं ग्रेट-ब्रिटनमध्यें वुइल्यम फ्रान्स ह्यानें एक साखळीची योजना आखली होती. एका व्यक्तीस फ्रान्स ह्यानें एक शिलिंग घेऊन पत्र पाठवावयाचें, त्यानें सदरहु पत्रांत लिहिलेल्या पांच नांवांपैकीं पहिल्या नांवावर व फ्रान्स ह्याचें नांवावर (म्यू. बे. प. कंपनी) अशा प्रत्येकी एक शिलिंगाच्या मनिऑर्डरी करावयाच्या, ज्यास मनिऑर्डर पाठविली असेल त्याचें याद्दींतील नांव खोडून आपलें नांव सर्वांत खालीं लिहावयाचें, ह्या पत्राच्या पांच प्रती त्यानें आपल्या मित्रांस वाटून त्यांस असेंच करावयास सांगावयाचें, अशी ही योजना होती. अशा रीतीनें वर्गणीदाराचें नांव वर वर चढत जाऊन ३,१२५ प्रतींची वांटणी होईल व त्यास सुमारें २,०००रु. मिळतील, असा हिशेब होता. कंपनीच्या कचेरीवर जप्ती आणून पोलिसांनीं फ्रान्सवर खटला भरला. ही साखळी शेवटपर्यंत पोहोंचण्यास सुमारें ९४ अब्ज रुपये लागतील असा अंदाज एका गणिताच्या प्रोफेसरानें आपल्या साक्षींत सांगितला. ही योजना ६० दिवस चालली, तर ६,१०,३५,१५६ पत्रें पोस्टांत पडतील व २८,९०,६२५ टायपिस्ट नोकरीवर ठेवावे लागतील, असें फिर्यादीतर्फे सांगण्यांत आलें. प्रत्येक मनुष्य साखळी चालू ठेवीलच अशी व्यवस्था करणें म्यूच्युअल बेनिफिट पब्लिशिंग कंपनीच्या शक्तीबाहेरची गोष्ट आहे; त्याचप्रमाणें, बक्षिसाच्या वांटणींत आपलें नांव येईल ह्या संभवावर विसंबून लोक वर्गणी भरतात ह्यामुळें कंपनीचा व्यवहार लॉटरीचे सदरांत येतो असें म्हणून मॅजिस्ट्रेटनें वुइल्यम फ्रान्सला दंड केला.

---

### दि सांगली बँक लिमिटेड, सांगली.

ह्या बँकेच्या ३-११-१९३७ अखेरच्या वर्षाचा रिपोर्ट व ताळेबंद आमचेकडे आला आहे. ह्या वर्षीं बँकेस २१,९३६ रु. इतका नफा झाला. पूर्व सालाच्या मानानें हा आकडा कमी असला तरी एकूण आर्थिक परिस्थितीचा विचार करतां तो समाधानकारक आहे असें म्हटलें पाहिजे. नफ्यापैकीं १३ हजारांचेवर एकूण रकम निरनिराळ्या रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आली आहे हें स्तुत्य आहे. बँकेचें वसूल झालेलें भांडवल २ लक्ष रुपये असून निरनिराळ्या फंडांत मिळून १ लक्षावर रकम जमा झाली आहे. त्यापैकीं इमारत फंडांत ४० हजार रुपये आहेत. एकूण ठेवी १६ लक्षांचे वर आहेत. शिल्लक ६¾ लक्ष असून कर्जरोख्यांत वगैरे सुमारें ७ लक्ष रुपये गुंतवण्यांत आले आहेत. ह्या दोन रकमांनीं बँकेचा पाया मजबूत केला आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमांची एकूण बेरीज ५ लक्ष ३३ हजार रुपये आहे. बुडीत व संशयित येणीं ३८ हजार रुपये आहेत. हा आकडा कांहींसा मोठा आहे; तथापि, ह्या येण्याचे बाबतींत सुमारें १९ हजारांचा रिझर्व्ह आतां जमला आहे. डिव्हिडंड ईक्वलायझेशन् फंडांतले २ हजार रुपये काढण्यांत येऊन भांडवलावर ५ टक्के डिव्हिडंड वांटण्यांत आलें आहे. रिपोर्टाचें साल पुरें झाल्यावर शेट लल्लूभाई दिलाचंद यांचकडे येणें राहिलेल्या रुपयास अडीच आण्यापैकीं रुपयास एक आणा म्हणजे १६,०८१ रु. तिसरें डिव्हिडंड म्हणून मिळालें असून लवकरच आणखी अर्धा आण्यापर्यंत डिव्हिडंड येईल अशी आशा रिपोर्टांत प्रकट केलेली आहे. बँकेचा ताळेबंद अधिक समाधानकारक होण्यास या रकमांचें सहाय झाल्यावांचून रहाणार नाहीं. बँकेचें एकूण खेळतें भांडवल २० लक्ष रुपयांचेवर आहे.

---

## नोटीस

" गव्हर्नमेंट सर्व्हंट्स महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक लि., लक्ष्मी रोड, पुणें शहर, या संस्थेचे सभासदांस कळविण्यांत येतें कीं, ता. २९ ऑगस्ट १९३७ रोजीं वार्षिक सभेमध्यें ठरल्याप्रमाणें बाय-लॉज् कमिटीनें बँकेचे नवीन पोटनियम केले आहेत, त्यांचा विचार करण्याकरितां तारीख १५ मे सन १९३८ रोजीं दुपारीं ४ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें, या बँकेच्या दिवाणखान्यांत स्पेशल जनरल मीटिंग भरणार आहे. तरी सदरहू वेळीं सभेस हजर राहण्याविषयीं सभासदांस आग्रहाची विनंति आहे.

वर नमूद केल्यावेळीं कोरम् न भरल्यास ही सभा त्याच दिवशीं, त्याच ठिकाणीं, दुपारीं ४॥ वाजतां भरणार आहे व त्या वेळीं वर नमूद केलेलें काम केलें जाईल."

कार्यकारी मंडळाचे हुकुमावरून

पुणें २६ एप्रिल १९३८ **आर. डी. भणगे**

ऑ. सेक्रेटरी,

गव्हर्मेंट सर्व्हंट्स महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें.

**सूचनाः**—सभेस येतांना प्रत्येक सभासदानें त्यांचेकडे पाठविली जाणारी नियमांची प्रत आणण्याची कृपा करावी.

---


" हंस "च्या ५ व्या कलाकृतीचा
सर्वत्र गौरव होत आहे
याचें कारण उघड आहे-" हंस " कडून प्रेक्षक करीत असलेल्या अपेक्षा हंसच्या या पांचव्या कलाकृतीनें पुऱ्या केल्या आहेत—
एका अति महत्त्वाकांक्षी
सत्तासुलतानाच्या अरेरावीनें
उडलेल्या हाहाःकाराची
भयंकर कहाणी
पांचवें भव्योदात्त
हंस चित्र
ज्वाला
लेखक—खांडेकर
दिग्दर्शक—विनायक
छायालेखक—पांडुरंग नाईक
: भूमिका :
चंद्रमोहन, रत्नप्रभा,
आशालता, विनायक.

### घर गहाणावर कर्जें देणारी प्रचंड संस्था

मध्यम स्थितींतल्या लोकांस स्वतःच्या मालकीचीं घरें विकत घेण्याचें सामर्थ्य नसतें. त्यांस घरें बांधून देऊन किंवा तीं खरेदी करण्यास पैसा पुरवून त्यांची किंमत हप्तेबंदीनें वसूल करण्याची व्यवस्था, त्या कामासाठीं स्थापलेल्या विशिष्ट संस्था करतात. सहकारी हाउसिंग सोसायट्यांनीं ह्या क्षेत्रांत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे आणि ह्या प्रकारच्या संस्था पुणें, मुंबई आणि अहमदाबाद इत्यादि शहरांत विस्तृत प्रमाणावर उद्योग करीत आहेत. घरें व इतर स्थावर जिंदगीच्या गहाणावर गरजू लोकांस कर्जें देऊन तीं हप्त्यांनीं वसूल करण्याचा व्यवहार त्या संबंधांतल्या संस्था व कर्जदार ह्यांस सारख्याच फायद्याच्या आहेत. ह्या संस्थांचें भांडवल दीर्घकालपर्यंत गुंतून पडत असल्यानें त्यांचे पैसे उभे करण्याचे व गुंतवण्याचे मार्ग विशेष प्रकारचे असतात. सावधगिरीनें व कार्यक्षम रीतीनें हा धंदा केल्यास तो टिकाऊ व यशस्वी होतो आणि तो समाजास उपकारक ठरतो.

हॅलिफॅक्स बिल्डिंग सोसायटी ही या प्रकारची ब्रिटिश संस्था सर्व जगांत अत्यंत प्रचंड आहे. तिचें एकूण खेळतें भांडवल १६२ कोटि रुपये आहे. दहा वर्षांमागें हा आकडा ६१ कोटि होता. म्हणजे, दहा वर्षांच्या अवधींत सोसायटीच्या भांडवलांत १०० कोटि रुपयांची वाढ झाली. अलीकडे दरवर्षीं सुमारें २७ कोटि रुपये सोसायटीकडून गहाणावर कर्जाऊ दिले जातात. खातेदारांची संख्याहि गेल्या दहा वर्षांत ३ लक्ष २९ हजारांपासून ७ लक्ष १२ हजारांचे वर गेली आहे. गंगाजळी वगैरे निधींत ६१½ कोटि रुपये आहेत. दर वर्षाचा नफा ७ कोटि रुपयांपर्यंत आला आहे. ग्रेट ब्रिटनच्या संपत्तीच्या मानानें ५ हजार पौंड म्हणजे सुमारें ६५ हजार रुपये ही रकम लहान आणि मध्यम स्थितींतल्या लोकांच्या आटोक्यांतली अशी समजली जाते. हॅलिफॅक्स सोसायटीच्या एकूण गहाणांपैकीं ८७ टक्के गहाणे ह्या मर्यादेमधलीं आहेत. एकंदर २ लक्ष ३९ हजार गहाणें आहेत, त्यांपैकीं १ लक्ष ९१ हजारांवरची येणे बाकी प्रत्येकीं ५०० पौंडांपेक्षां ज्यास्त नाहीं. ह्यावरून सामान्य स्थितींतल्या लोकांस घरें विकत घेण्यास विशेष सवलती देण्याचें सोसायटीचें धोरण स्पष्ट होतें.

---

### "बेस्ट" कंपनीचें १२ टक्के डिव्हिडंड

बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय ॲण्ड ट्रामवेज कं. लि. ह्या मंडळीस गेल्या वर्षाचे कारभारांत ४५ लक्ष, २० हजार रु. नफा झाला. भागीदारांस १२ टक्के करमाफ डिव्हिडंड देण्याचें ठरलें.


जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कॉन्ट्राक्टर
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

**ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत**
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

**स्त्रियांचा आजार**
म्हणजे मुख्यत: विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—
**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

अप-टु-डेट शिलाई करतां
**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**
बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर


पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना **गेस्ट हाऊस**
टेलिफोन नं. ७७१ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य


# नव्या फोर्ड गाड्या

तीस हॉर्स पॉवरच्या आणि बावीस हॉर्स पॉवरच्या अशा दोन

## नव्या फोर्ड व्ही एट मोटार गाड्या

आमच्या शोरूममध्यें पहाण्यासाठी ठेवल्या आहेत.





- ह्या गाड्यांमध्यें हें विशेष नावीन्य आहे कीं त्या दिसण्यांत सुंदर असून सुखकारक आणि सुरक्षित आहेत.
- ह्या नव्या फोर्ड व्ही एट गाड्या इतक्या आकर्षक आहेत कीं सर्व मोटार वापरणारांस त्या तात्काळ पसंत होतील अशी आमची खात्री आहे.
- दहा हॉर्स पॉवरच्या व आठ हॉर्स पॉवरच्याहि गाड्या पहाण्यासाठी ठेवल्या आहेत.

## सिल्व्हर ज्युबिली मोटार्स लि०

१२, आर्सेनाल रोड, : : : : : पुणें.

## नासिक जि. सहकारी इन्स्टिट्यूट

### फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स

नासिक जिल्ह्यांतील फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स नासिक येथें ता. ७-४-१९३८ रोजीं श्री. एम. डी. भनसाळी, रजिस्ट्रार, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं असि. रजिस्ट्रार, स्पेशल ऑडिटर को. सोसायटीज् उत्तर भाग, श्री. आर. बी. पालेकर ऑडिटर को. सोसायटीज नासिक विभाग, श्री. व्ही. आर. शिंदे ऑडिटर को. सोसायटीज मालेगांव विभाग व जिल्ह्यांतील प्रमुख सहकारी पुढारी व कार्यकर्ते हजर होते. आरंभीं रजिस्ट्रार-साहेबांनीं परिषदेचा उद्देश व महत्त्व सांगून आपापल्या अडचणी मोकळ्या मनानें पुढें मांडून ऊहापोह करण्याविषयीं सूचना केली. त्याप्रमाणें हजर असलेल्या पुढाऱ्यांनीं व कार्यकर्त्यांनीं मोकळ्या मनानें महत्त्वाच्या विषयावर चर्चा करून कार्यांतील प्रचलित अडचणी पुढें मांडल्या व रजिस्ट्रारसाहेबांनीं त्याबाबत जरूर तो सविस्तर खुलासा केला. थकबाकी वसूल करावयाची उपाय योजना, गोठून गेलेलें कर्ज, संशयित कर्ज आणि बुडीत कर्ज या बाबतचें धोरण व शेतीच्या मालाची सहकारी तत्त्वावर विक्री वगैरे विषयावर सुमारें तीन तास चर्चा झाल्यावर अध्यक्षांचे आभार मानण्यांत आले व परिषदेचें काम समाप्त झालें.

---

### पूर्व खानदेश जिल्हा को. इन्स्टिटयूट, जळगांव

या जिल्हा शाखा कोऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटमार्फत जळगांव येथें तारीख १६-५-३८ ते ३०-५-३८ अखेर कोऑपरेटिव्ह सोसायट्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देणारा वर्ग भरविला जाणार आहे. विशेष माहिती वरील ऑफिसकडे मिळेल.

### पश्चिम खानदेश को. इन्स्टिटयूट, धुळें

दरसालप्रमाणें ह्या इन्स्टिट्यूटमार्फत धुळें येथें "रूरल सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग" ता.८ मे १९३८ पासून वीस दिवस चालणार आहे. तरी ज्या सेक्रेटरींना व इतर उमेदवारांना सदर वर्गाचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांनीं अर्ज व फी प्रॉपगंडा ऑफिसरचे नांवावर पाठवावीं.

---

### कऱ्हाड अर्बन को. बँक लि.

वरील बँकेस स्थानिक ५० हजार रुपयांपर्यंत ठेवी स्वीकारण्यास रजिस्ट्रार साहेबांच्या २३-४-३८ च्या पत्र नं. १३०९१२ अन्वयें परवानगी मिळाली आहे.

---

### श्री. सावंत ह्यांचा उपक्रम

गायकवाड-बडोदा स्टेट रेल्वेचे लोकोमोटिव्ह व कॅरेज सुपरिंटेंडेंट, श्री. ए. के. सावंत ह्यांनीं, एक मोटार इंजन तयार केलें आहे. हिंदुस्थानांतील परिस्थितीस अनुरूप अशी त्याची बांधणी असून तें हिंदी मालाचें बनवलेलें आहे. त्याची अश्वशक्ति १० आहे व २ लक्ष मैलपर्यंत तें उत्कृष्ट काम देईल. श्री. सावंत ह्यांच्या इंजनांत त्याच्या शक्तीच्या इतर कोणत्याहि इंजनापेक्षां सुटे भाग १० टक्क्यांनीं कमी आहेत. हिंदुस्थानांत मोटारगाड्या तयार केल्यास गाडीची किंमत १,६०० रुपयांचे वर जाणार नाहीं असें श्री. सावंत ह्यांचें म्हणणें आहे. त्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे आपल्या इंजनास पेटंट मिळण्यासाठीं लिहून पाठविलें आहे.

## नोटिस.

### टेंडर भरणेबाबत.

आमचे मालकीची सदाशिव पेठ, घर. नं. ९८० (पूर्वींचा केळकर यांचा वाडा) पुणें, येथें असलेली इमारत पाडून सर्व जागा दोन महिन्यांचे आंत साफ करून घेणें आहे. तरी वरील जागेवरील इमले पाडून मालमसाला नेणें व जागा साफ करणें या कामाबाबतचीं टेंडरें आज तारखेपासून आठ दिवसांचे आंत भरून सायंकाळीं ५ वाजेपर्यंत आमचे कचेरींत पाठवावींत.

टेंडर स्वीकारण्याबाबतचे सर्व हक्क कंपनीकडे राहातील व तिचा या बाबतचा निकाल अखेरचा व कायम मानला जाईल. मिळकतीचें वर्णन कॉमनवेल्थ विमा कंपनीचे कचेरींत दुपारीं १२ ते ५ वाजेपर्यंत मिळेल.

कॉमनवेल्थ विमा कं. लि.,<br>११ बुधवार पेठ, पुणें.<br>३ मे, १९३८.

आर. एन. अभ्यंकर,<br>मॅनेजिंग एजन्ट्स.

---


## स्वल्प व्याजानें कर्ज

ता. २७ जून १९३८ रोजीं पहिल्या कर्ज वांटणीस कंपनीच्या नियमानुसार सुरवात होणार असून पूर्ण पैसे भरून सर्टिफिकेट घेणारांचेच नंबर कर्ज वांटणीच्या यादींत समाविष्ट होतील तरी ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांनीं ते तातडतोब भरावेत व स्वल्प म्हणजे ६॥% व्याजानें रु. १०० ते ५००० (सर्टिफिकेटचें सपांप्रमाणें) कर्ज घेऊं इच्छिणारांनीं अवघे रु. २४ भरून, सर्टिफिकेट्स घेण्याची त्वरा करावी. तारखेकडे लक्ष ठेवा. गांवोगांवीं एजन्टस पाहिजेत. प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ८ॽ चीं तिकीटें पाठवा. अगर समक्ष भेटा.

### दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमण करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर,<br>बी. ए. एलएल. बी.<br>मॅनेजिंग एजंट.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी कर्जरोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११८—४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०३–११ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—७ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–८½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—८ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२२—० |
| **मंडळ्यांचे भाग** | |
| ( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. ) | |
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १३९—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १११–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११७—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७१२—८ |
| **वीज** | |
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२६—९ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २००—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४१७—८ |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १४५–१० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४०—० |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३७–१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १७०—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २३१—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ९८५—० |

### सर विश्वेश्वरअय्या कमिटीचा रिपोर्ट

मुंबई सरकारच्या पाणीपुरवठ्याबाबतच्या धोरणासंबंधीं चौकशी करून शेतकऱ्यांच्या अडचणींचें निवारण करण्यासाठी सूचना करण्याकरितां प्रांतिक सरकारनें सुमारें चार महिन्यांमागें सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरअय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली एक प्रातिनिधिक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें आपला रिपोर्ट आतां पुरा केला आहे. येत्या पांच वर्षांत पाणीपुरवठ्याच्या योजनांवर खर्चण्यासाठी ७५ लाख रुपयांची तरतूद, कालव्यासंबंधींच्या प्रश्नांवर सरकारास सहकारित्वानें सल्ला देण्याकारितां कॅनाल कमिट्यांच्या नेमणुका, प्रांतिक इरिगेशन बोर्डाची स्थापना, इत्यादि कमिटीच्या प्रमुख शिफारसी आहेत. साखर कारखान्यांशीं झालेले करार सुधारून घेऊन प्रत्येक एकरी निश्चित पाण्याचा दर ठरविण्यांत यावा, अशी कमिटीची सूचना आहे. बेलापूर शुगर सिंडिकेटला देण्यांत आलेल्या सवलती इतर साखर कारखान्यांसहि मिळाव्यात; मात्र दुय्यम पाट बांधण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत यावी, असें कमिटीचें म्हणणें आहे. सध्या अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांस शक्य तेवढी मदत द्यावी परंतु नवीन कारखान्यांच्या स्थापनेस सरकारनें उत्तेजन देऊं नये, असा कमिटीचा आग्रह आहे. एकाच मोसमांत, विशिष्ट तारखेपर्यंतच पाणी मिळेल ह्या अटीवर, दोन पिकें काढण्यास प्रतिबंध नसावा व पाण्याचा पुरवठा मुबलक असेल, तर मोसमाची मुदत वाढविण्यांत यावी, असेंहि कमिटीनें सुचविलें आहे. सध्याच्या कालव्याखालीं नवीन कोणतीं पिकें करतां येतील, ह्यासंबंधीं हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरहि संशोधन करण्यांत यावें व उंसावरील पाणीपट्टी पिकाच्या बाजारभावावर अवलंबून ठेवावी अशी तिची शिफारस आहे.

---

### विषारी वायूपासून रक्षणारीं मुखत्राणें

हवेंतून शत्रूचा हल्ला होऊन विषारी वायू पसरवण्यांत येईल, त्यापासून जनतेचा बचाव करण्याकरितां लहान-मोठ्या माणसांस मुखत्राणें पुरवण्याची जय्यत तयारी ग्रेटब्रिटनमध्यें सरकारनें चालविली आहे. तीन कोटि मुखत्राणें तयार आहेत आणि नवीन झपाट्यानें बनवलीं जात आहेत. प्रसंग येईल तेव्हां बायकांमुलांस मुखत्राणें सर्वत्र सहज मिळावीं आणि त्यांस तीं नीट वापरतां यावीं ह्यासंबंधानें तजवीज केली जात आहे. यापुढें युद्ध झालेंच तर त्याचें स्वरूप कसें असेल आणि त्याबद्दलची पूर्वतयारी कशा प्रकारची पाहिजे ह्याची कल्पना मुखत्राणांच्या तजविजीवरून येण्यासारखी आहे.

---

### ब्रिटिश नागरिकत्वाचा हक्क कसा मिळतो ?

ब्रिटिश नागरिकत्वाचा हक्क मिळावा म्हणून अर्ज करणाऱ्या मनुष्यानें अर्जापूर्वीच्या आठ वर्षांपैकीं पांच वर्षें ग्रेटब्रिटनमध्यें काढलेलीं असणें आवश्यक असतें. शेवटचें वर्ष ब्रिटनमध्येंच घालवलेलें पाहिजे. चांगल्या वर्तनाबद्दल व ब्रिटिश साम्राज्यांत रहाण्याची इच्छा असल्याविषयीं अर्जदारानें आपलें म्हणणें पटवून दिलें पाहिजे. ग्रेटब्रिटनमध्यें जन्मलेल्या पांच ब्रिटिश नागरिकांनीं अर्जदाराच्या अर्जावर, अर्जांतील मजकूर खरा असल्याबद्दल लिहून दिलें पाहिजे. नागरिकत्वाचा हक्क देणारें सर्टिफिकेट मिळविण्यास फी व कर मिळून सुमारें १२५ रुपये खर्च येतो.


अप—टु—डेट पुण्यांत पहिलें उच्च दर्जाचें अप—टु—डेट

**हेअर कटिंग सलून**

येथें अधुनिक इलेक्ट्रिक मशीनच्या सहायानें केस कापले जातात. इलेक्ट्रिक हेअर ब्रश व मसाज यांची व्यवस्था. स्वच्छता व टापटीप हें आमचें वैशिष्ट्य. तज्ञ माणसाकडून विजेच्या सहायानें काम सुबक व स्वच्छ होतें.

पत्ताः—प्रो. डी. एम. आढाव, पी. डी. ब्रदर्स बिल्डिंग, टांगा स्टँड शेजारीं, डक्कन जिमखाना.

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashio Peth
POONA

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth. Poona City.

—कार्यक्रम—
( १ ) वर्षप्रतिपदेला ( चैत्र शुद्ध १ )
मशिनरीच्या उभारणीला प्रारंभ.
( २ ) १९३९ च्या जानेवारींत
साखर करण्यास प्रारंभ.
दरवर्षी ५॥ टक्के व्याज
व
दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.
सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेलः—
दि बृहन्महाराष्ट्र शुगर
सिंडिकेट लिमिटेड.
२५७ बुधवार पेठ, बेलबागेसमोर,
भिडेवाडा, पुणें २.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोपाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व
रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co.
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

भारतीय अर्थशास्त्र
लेखकः-प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये
प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा घ. नं. ९२७।१३, पुणें शहर. येथें प्रसिद्ध केलें.